

धुक्यामध्ये हरवलेलं सातपुडा पर्वत रांगेतील निसर्गरम्य हिलस्टेशन भिंगारा...


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४०७ शनिवार दि ०४ जुलै २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# अर्ध-पाकिस्तानी म्हणणे बदनामीकारक; आमदार संजय गायकवाड यांना असीम सरोदे यांची कायदेशीर नोटीस

**जनसंचलन-बुलढाणा**

केवळ असीम या नावावरून अर्ध-पाकिस्तानी असा उल्लेख करून धार्मिक पूर्वग्रहातून बदनामी केल्याप्रकरणी सुप्रसिद्ध विधीज्ञ व घटनातज्ज्ञ ॲड. असीम सरोदे यांनी बुलढाण्याचे शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. या नोटीसमध्ये ७ दिवसांच्या आत जाहीर माफी मागण्याची आणि बदनामीकारक वक्तव्ये मागे घेण्याची मागणी करण्यात आली असून, अन्यथा फौजदारी व दिवाणी कारवाईचा इशारा दिला आहे.

वादाची पार्श्वभूमी काय?

ॲड. असीम सरोदे यांनी त्यांचे पक्षकार आणि भाजपचे माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या वतीने १५ मे २०२६ रोजी आमदार संजय गायकवाड यांना एक नागरी व फौजदारी बदनामीची नोटीस पाठवली होती. याचाच राग मनात धरून १० जून २०२६ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत आमदार गायकवाड यांनी असीम सरोदे यांच्यावर वैयक्तिक टीका केली होती. मला सरोदे यांच्या बुद्धीची कीव येते आणि हे भूत अर्धा पाकिस्तानी अर्धा हिंदुस्थानी आहे अशी वादग्रस्त विधाने गायकवाड यांनी केली होती, जी विविध वृत्तवाहिन्या आणि सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाली.

नावावरून पूर्वग्रह आणि कल्चरल रेसिझम: केवळ नाव मुस्लिमसदृश असल्यामुळे एखाद्या भारतीय नागरिकाला पाकिस्तानी संबोधणे अत्यंत अपमानास्पद असून, हा प्रकार धार्मिक पूर्वग्रहावर आधारित छळ आणि कल्चरल रेसिझम (सांस्कृतिक वर्णद्वेष) दर्शवतो.

प्रतिष्ठेला धक्का: गेल्या २६ वर्षांपासून वकिली क्षेत्रात कार्यरत असलेल्या सरोदे यांची समाजात मोठी प्रतिष्ठा आहे. व्यावसायिक कर्तव्याचा भाग म्हणून नोटीस दिली असताना, त्याला कायदेशीर उत्तर न देता अशा प्रकारे वैयक्तिक आणि देशद्रोहाचे आरोप करणारे वक्तव्य करणे हे सरोदे यांची प्रतिमा मलिन करण्याच्या हेतूनेच केले गेले आहे.

संविधानाचा चुकीचा वापर: अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे निरंकुश नाही. आमदार पदावर असलेल्या व्यक्तीने असे असंवेदनशील वर्तन करणे लज्जास्पद असून लोकप्रतिनिधी असण्याने कोणालाही बदनामी करण्याचे कायदेशीर संरक्षण मिळत नाही.

ॲड. असीम सरोदे यांनी स्पष्ट केले आहे की, आमदार गायकवाड यांनी ज्या माध्यम





प्लॅटफॉर्मवरून ही विधाने केली, तिथेच ७ दिवसांच्या आत जाहीर माफी मागावी आणि भविष्यात अशी विधाने न करण्याची लेखी हमी द्यावी. तसे न केल्यास भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ३५६ (फौजदारी बदनामी) अंतर्गत आणि टॉर्ट कायद्यानुसार दिवाणी न्यायालयामध्ये नुकसानभरपाईसाठी कायदेशीर खटला दाखल केला जाईल, असा इशारा या नोटिशीतून देण्यात आला आहे. यासाठी पत्रकार परिषदेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि डिजिटल पुरावे सक्षम न्यायालयासमोर सादर करण्याचा हक्कही त्यांनी राखून ठेवला आहे.

# देऊळगाव राजात शिकलगर समाजाचा आक्रोश काही गावगुंडांमुळे संपूर्ण समाज बदनाम? आता थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे जिल्हाबंदीची मागणी!

**जनसंचलन देऊळगाव राजा**

शांततेने जीवन जगणाऱ्या शिकलगर समाजाची प्रतिमा काही कथित गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमुळे मलीन होत असल्याचा आरोप करत देऊळगाव राजा व सिंदखेडराजा परिसरातील शिकलगर समाजबांधव आता आक्रमक झाले आहेत. संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करून त्यांना जिल्हाबंदी करण्यात यावी, अशी मागणी समाजबांधवांनी थेट जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, पोलीस अधीक्षक तसेच देऊळगाव राजा पोलीस निरीक्षक ब्रह्मगिरी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शिकलगर समाज गेल्या २० ते २५ वर्षांपासून देऊळगाव राजा व सिंदखेडराजा परिसरात वास्तव्यास असून मेहनत-मजुरी, वराह व्यवसाय आणि इतर व्यवसायातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे. समाजातील अनेक कुटुंबे आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊन उच्च पदावर पोहोचविण्यासाठी संघर्ष करत आहेत. मात्र याच समाजातील काही कथित गावगुंडांच्या बेकायदेशीर कृत्यांमुळे संपूर्ण समाजाला बदनामी, संशय आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची खंत समाजबांधवांनी व्यक्त केली. निवेदनात चोरी, घरफोडी, दादागिरी, मारहाण तसेच बाहेरील गुन्हेगारांशी संबंध ठेवून परिसरातील गुन्हेगारीला खतपाणी घालण्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. अशा प्रवृत्तीमुळे महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायद्याचे पालन करणाऱ्या समाजबांधवांनाही विनाकारण संशयाच्या नजरेने पाहिले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित व्यक्तींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची सखोल चौकशी करून महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार तडीपार व जिल्हाबंदीची कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक ब्रह्मगिरी यांनी निवेदन स्वीकारून



कायदेशीर पडताळणी करून नियमानुसार कारवाई करण्याचे आश्वासन दिले. कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या घटकांवर दया दाखविली जाणार नाही, असा इशाराही देण्यात आल्याची माहिती समाजबांधवांनी दिली.

# तोतयांना मोकळे रान



आपला मोबाइल क्रमांक दडवून खऱ्या-खोट्या नावांनिशी संवादाची मुभा देणाऱ्या ङ्कयूजरनेमम या व्हॉट्सअ‍ॅपच्या नियोजित सुविधेबाबत खबरदारी घेण्याची केंद्र सरकारची भूमिका योग्यच आहे. याबाबत केंद्राने व्हॉट्सअ‍ॅप चालवणाऱ्या मेटा कंपनीला नोटीस बजावली आहे; तसेच याविषयी संपूर्ण स्पष्टीकरण आणि व्यापक चर्चेविना ही सुविधा सुरू न करण्याचे निर्देशसुद्धा कोट्यवधी वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहेत. एकीकडे ओळख लपवून होणाऱ्या सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, हा चिंतेचा विषय ठरत असतानाच अशा सुविधांना परवानगी देण्याबाबत सरकारला काळजी वाटणे साहजिक आहे. ही सुविधा वापरकर्त्यांच्या फायद्याची असून, तिच्या सुरक्षिततेबाबत काळजी घेतल्याचा दावा ङ्कमेटाफने केला आहे; मात्र त्याच्या वापरातून अनेक धोक्यांना निमंत्रण मिळताना प्रथमदर्शनी तरी दिसते. बदलत्या काळात संवाद-संपर्काची अनेक साधने दररोज बाजारात दाखल होत असली, तरी ङ्कव्हॉट्सअ‍ॅपफने आपल्या सुलभ-वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे जगभरातील संपर्काच्या क्षेत्रात जवळपास मक्तेदारी निर्माण केली आहे. ङ्कव्हॉट्सअ‍ॅपफचा भारतात सुमारे ५० कोटी नागरिक वापर करतात. व्हॉटसअ‍ॅपच्या ङ्कयूजरनेमम या फीचरची घोषणा मध्यंतरी करण्यात आली. ते स्वीकारल्यानंतर वापरकर्त्यांना आपला मोबाइल क्रमांक दडवून ठेवून खऱ्या किंवा टोपणनावाने संवाद साधण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. या वैकल्पिक फीचरचा महिलांसह अन्य वापरकर्त्यांना आपला खासगीपणा जपण्यासाठी उपयोग होईल; तसेच नवे आशयनिर्माते किंवा आपल्या ब्रँडची विशिष्ट ओळख मिळवण्यासाठी व्यावसायिक व अन्य संस्थांना त्याचा फायदा होऊ शकेल, हा त्यामागील उद्देश असल्याचे कंपनीकडून सांगितले गेले. काही दिवसांतच लाखो वापरकर्त्यांच्या त्यावर उड्या पडल्या. मात्र, त्याची अंगभूत वैशिष्ट्ये पाहता केंद्राने त्याला चाप लावण्याचा प्रयत्न केला आहे. ऑनलाइन फसवणूक, लैंगिक शोषण आणि अफवा पसरवण्यासाठी गुन्हेगार व समाजकंटक या सुविधेचा वापर करून घेतील, ही सरकारने व्यक्त केलेली भीती साधार आहे. अशीच ओळख लपविण्याची सुविधा असलेल्या ङ्कटेलिग्राममचा ङ्कनीटफ पेपरफुटीमागे वाटा असल्याच्या संशयावरून सरकारने परीक्षाकाळात त्यावर बंदी घातल्याची घटना ताजी आहे. सध्या आपली ओळख लपवून विरोधी विचारांवर हल्ला करणाऱ्या ङ्कट्रोलरफच्या फौजांनी अनेकांना समाजमाध्यमांवर हैराण केले आहे; अशा फीचरने समाजकंटकांना आणखी नवे हत्यार देण्यात हशील नाही. गेल्या काही काळात ऑनलाइन गुन्ह्यांमध्ये २४ टक्के वाढ झाली असून, वर्षभरात २८ लाख सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यामध्ये बँक खात्यातून फसवणूक, डिजिटल अ‍ॅरेस्ट, लग्नविषयक फसवणूक, लैंगिक शोषण अशा प्रकारच्या गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आहे. अशाच प्रकारे ओळख लपवता येणारे ङ्कडार्क वेबफहे सर्व प्रकारच्या गुन्हेगारीचे आगार आहे, हे नव्याने सांगायला नको. एखाद्याचे ङ्कयूजरनेमम भलत्यानेच आधी नोंदवले, तर प्रामाणिक वापरकर्त्याला स्वत:चे नाव न मिळण्याची अडचणही आहेच. सरकारी विभाग, सेलिब्रिटी किंवा ङ्कव्हेरिफाइडफ वापरकर्त्यांची नावे राखीव राहणार असली, तरी सरकारी खाती-बँकांच्या नामसाधर्म्याचे यूजरनेम घेऊन फसवणूक सहज शक्य आहे. कोणत्याही खासगीपणाचा आदर करतानाच या कंपन्यांनी संबंधित देशातील कायद्यांच्या चौकटीतच सेवा दिली पाहिजे, ही अपेक्षा चुकीची ठरणार नाही. अशा गैरप्रकारांना चाप लावण्यासाठी एकीकडे केंद्र सरकार सिमकार्डाशिवाय ङ्कव्हॉटस्अ‍ॅपफच्या वापरावर निर्बंध (सिम बाइंडिंग) आणत आहे; त्याच्याशी नवे फीचर पूर्णत: विसंगत आहे. आपल्या माध्यमाची विश्वासार्हता वाढवण्यासाठी ङ्कएक्सफसारखे प्लॅटफॉर्म पडताळणी केलेली ङ्कब्लू टिकफ सारखी सुविधा आणत असताना दुसरीकडे हा अनामिकतेचा आग्रह पटण्याजोगा नाही. प्रगत देशांमध्ये खासगीपणाच्या सुविधेबाबत सकारात्मक भूमिका असली, तरी तेथे सुरक्षाविषयक कायदे आणि तंत्रज्ञानविषयक साक्षरतेचे प्रमाणही मोठे आहे. भारतासारख्या देशात सायबर गुन्ह्यांची वाढती संख्या पाहता अशा तोतयेगिरीला निमंत्रण धोकादायक ठरू शकते. अनेक गुप्तचर आणि सुरक्षा यंत्रणांनी अशा सुविधेतून गुन्हेगारी कारवाया किंवा अमली पदार्थांसारख्या बेकायदा व्यापाराला चालना मिळू शकते, असा इशारा दिला आहे. त्यामुळेच वापरकर्त्यांचे हित लक्षात घेता, सर्व शंकांचे निराकरण झाल्याशिवाय अशा सुविधांना परवानगी मिळता कामा नये.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# सचिन अहिर यांचा शिंदे सेनेत प्रवेश; उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का : उपसभापतीपदासाठी भरला अर्ज

**मुंबई/वृत्तसंस्था**

विधान परिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीने एक नवा ट्विस्ट समोर आणला आहे. ठाकरे सेनेचे सहा खासदार फुटून एक आठवडाही होत नाही तोच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा ठाकरे सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना धक्का दिला आहे. शिंदे यांनी वरळीतील ठाकरे गटाचे खंदे शिलेदार आणि विधान परिषदेतील आमदार सचिन अहिर यांना फोडून त्यांना थेट उपसभापतीपदाची उमेदवारी देत अर्जही दाखल केला. शिंदे यांच्या या खेळीने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे, तर दुसरीकडे शिंदे यांच्या अनपेक्षित खेळीने या पदासाठी इच्छुक असलेल्या माजी उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे नाराज झाल्या आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात 'ऑपरेशन टायगर' राबवून ठाकरे सेनेचे सहा खासदार फोडले. त्यापाठोपाठ ठाकरेंचे अनेक आमदारही शिंदे सेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. नुकत्याच सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी 'आणखी झटके देणार' असल्याचा इशाराही ठाकरे गटाला दिला होता.



राजकीय पक्ष आणि प्रसारमाध्यमांना कानोकान माहिती नसताना सचिन अहिर यांनी मंगळवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्यावतीने उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज भरला. ही माहिती वेगाने पसरताच प्रसामाध्यमांमध्ये ठाकरे सेनेचे आमदार अहिर फुटल्याची बातमी झळकली. अर्ज दाखल करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री संजय शिरसाट, आमदार कृपाल तुमाने, मनिषा कायंदे, दुष्यंत चतुर्वेदी, चंद्रकांत रघुवंशी आणि इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

सचिन अहिरांच्या पक्षप्रवेशानंतर अहिर यांनी शिंदेंच्या शिवसेनेकडून विधानपरिषदेच्या उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केला आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यावर उपमुख्यमंत्री शिंदे आणि सचिन अहिर यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर जोरदार निशाणा साधला. यावेळी ते म्हणाले की, 'आम्ही कोणत्याही प्रकारचं तोडकाम करत नाही, तर जोडकाम करतो. आम्ही इथे तोडायला नाही, तर जोडायला आलो आहोत. काही लोक तुडवायला आले, पण आम्ही शिवसेना (wirपएमदं) वाढवायला आलो आहोत. आमचा अजेंडा खुर्ची मिळवणे हा नसून, ज्या लोकांनी आम्हाला खुर्चीत बसवलं त्यांचे प्रश्न सोडवणं हाच आमचा अजेंडा आहे', असे शिंदेंनी म्हटले.

### वेळेवर योग्य रितीने योग्य उत्तर देईन

पक्षप्रवेशानंतर माध्यमांशी बोलताना सचिन अहिर म्हणाले, मी एकनाथ शिंदे यांचा आभार मानतो. शिंदेंनी मला उपसभापती या पदावर मान दिला. तळागाळातील कार्यकर्ता या पदावर जाऊ शकतो हे त्यांनी दाखवून दिले, त्यांनी कॉमन मॅन म्हणून मुख्यमंत्री असताना काम केले. सरकारमध्ये राहून काम केले पाहिजे. पण विधिमंडळातूनही काम करण्याचं काम मी त्यांच्या नेतृत्वात करणार आहे. उपसभापतीपदासाठी अनेक लोकांची नावे घेता येतील. रा. सू. गवई, वसंत डावखरे, माणिकराव ठाकरे आणि नीलम गोऱ्हे यांनी उपसभापती म्हणून मोठे काम केले, तीच गरीमा मी ठेवणार आहे. ग्रामीण भागात जाऊन काम करणार आहे.

## वाळू उपसासाठी झिरो रॉयल्टी धोरण; बावनकुळे यांची घोषणा

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था**

मुंबई: बांधकाम क्षेत्राला गती देण्यासाठी वेळेत वाळू उपलब्ध करून दिली जाईल. नंदूरबार जिल्ह्यात परराज्यातून येणाऱ्या वाळूबाबत 'झिरो रॉयल्टी'चे धोरण चालू अधिवेशन संपण्यापूर्वीच जाहीर करण्यात येईल, अशी महत्त्वाची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत केली.



आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी नंदूरबार जिल्ह्यातील वाळू टंचाई आणि गुजरातवरून येणाऱ्या वाळूबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी बावनकुळे यांनी उत्तर दिले. वाळू आणि इतर गौण खनिजांची अवैध वाहतूक पूर्णपणे रोखण्यासाठी केंद्र सरकारच्या 'रेलटेल' कंपनीच्या माध्यमातून ऑनलाईन मॉनिटरिंग प्रणाली विकसित करण्यात आली आहे. कोकण विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात राज्यस्तरीय 'वॉर रूम' सुरू करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. नंदुरबार जिल्ह्यातील तापी नदीमध्ये मुबलक वाळू साठा उपलब्ध आहे. नदीत ३६५ दिवस पाणी असल्याने पारंपरिक पद्धतीने वाळू काढणे अशक्य होते. शेजारील गुजरात राज्यात सक्शन पंप लावून १२ ही महिने वाळू काढली जाते, तशी परवानगी महाराष्ट्रात नसल्याने स्थानिक पातळीवर वाळू टंचाई निर्माण होऊन विकासकामे ठप्प झाली आहेत. कोकण किनारपट्टीच्या भागात ज्याप्रमाणे सक्शन पंपाच्या साहाय्याने वाळू काढण्याची विशिष्ट धोरणात्मक परवानगी पर्यावरण विभागाने दिली आहे, त्याच धर्तीवर नंदुरबार जिल्ह्यातील तापी नदीपात्रासाठी सक्शन पंप लावण्याचा विशेष प्रस्ताव सरकार आणत आहे. पर्यावरण विभागाने मंजूर केलेल्या मर्यादित प्रमाणातच हा उपसा केला जाईल. स्थानिक पातळीवर वाळू उपलब्ध होईपर्यंत गुजरात किंवा इतर राज्यांतून वाळू आणता येईल. यासाठी संबंधित राज्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना वाळू उपलब्ध असल्याचा प्रस्ताव किंवा पत्र देणे अनिवार्य राहील. या अधिकृत पत्रव्यवहारानंतर दोन्ही बाजूच्या जिल्हाधिकाऱ्यांचे 'टायअप' करून नंदुरबारला आवश्यक तेवढी वाळू 'झिरो रॉयल्टी'वर उपलब्ध करून दिली जाईल. ही वाळू वाहतूक फक्त दिवसाच करावी लागेल, रात्रीच्या वाहतुकीला पूर्ण बंदी असेल. परराज्यातून वाळू उपसा करताना झिरो रॉयल्टीचे धोरण लवकरच सभागृहात ठेवले जाईल, असे मंत्र्यांनी स्पष्ट केले.

## शक्तिपीठ महामार्गाविरोधात सांगलीतील शेतकरी आक्रमक; आझाद मैदानावर धरणे आंदोलन!



**सांगली/वृत्तसंस्था**

शक्तिपीठ महामार्गाला विरोध करणाऱ्या सांगली जिल्ह्यातील बाधित शेतकरी आज एकत्र आले होते. सरकारकडून त्यांच्या आंदोलनाची आणि मागण्यांची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत, सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ७ जुलै रोजी मुंबईतील आझाद मैदानावर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी प्रतिनिधींनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी शक्तिपीठ महामार्ग विरोधी आंदोलनाचे प्रमुख समन्वयक तथा कामेरीचे लोकनियुक्त सरपंच रणजित पाटील आणि शेतकरी नेते बी. जी. (काका) पाटील यांनी आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली.

शक्तिपीठ महामार्गामुळे सुपीक शेती, घरे आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर परिणाम होणार असल्याचा आरोप त्यांनी केला. पावसाळी अधिवेशन सुरू असताना सरकारने हा प्रश्न गांभीर्याने घ्यावा आणि प्रस्तावित महामार्गाबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. पत्रकार परिषदेला कॉम्रेड धनाजी गुरव, शहाजी पाटील, गुंडा पवार, वकील विजय पाटील, वकील दीपक लाड, इंद्रजीत पाटील तसेच जिल्ह्यातील शक्तिपीठ बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीच्या ऑफरबद्दलच्या वक्तव्यावर अमोल कोल्हेंचं स्पष्टीकरण

**मुझफ्फराबाद/वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या राजकारणात मागील काही दिवसांपासून मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी ठाकरेंच्या सेनेतील सहा खासदारांनी शिंदेंच्या सेनेत प्रवेश केला. त्यानंतर ठाकरे सेनेचे आमदार सचिन अहिर यांनीही शिंदेंच्या सेनेचा झेंडा हाती घेतला. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'ऑपरेशन टायगर'ची अद्यापही मोठी चर्चा सुरू आहे. या चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे 'ऑपरेशन घड्याळ'च्या चर्चा रंगल्या आहेत.

या घडामोडी दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते तथा खासदार अमोल कोल्हे यांनी एक मोठं वक्तव्य केलं होतं. 'महायुतीमधून ऑफर आल्यास विचार करू', असं अमोल कोल्हे यांनी म्हटलं होतं. तसेच देश पातळीवर देवेंद्र फडणवीस यांची 'इन्फ्रा मॅन' म्हणून प्रतिमा कौतुकास्पद वाटते अशी स्तुतीसुमने अमोल कोल्हे यांनी उधळली होती. त्यामुळे उलटसुलट चर्चांना उधाण आलं होतं.



खासदार अमोल कोल्हे यांनी आता त्यांनी महायुतीच्या ऑफरबाबत केलेल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण देत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. 'माझं वक्तव्य हे फक्त रेल्वेच्या प्रश्ना संदर्भातील होतं. पण माझ्या वक्तव्याचा वेगळा अर्थ काढण्यात आला', असं स्पष्टीकरण अमोल कोल्हे यांनी दिलं आहे. महायुतीच्या ऑफरबाबत तुम्ही बुधवारी एक वक्तव्य केलं होतं, त्यानंतर चर्चांना उधाण आलं होतं. त्यावर तुमची प्रतिक्रिया काय? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर अमोल कोल्हे म्हणाले की, "काल एका पत्रकार परिषदेत बोलत असताना एका पत्रकारांनी मला प्रश्न विचारला की राजाभाऊ वाजे आणि अमोल कोल्हे भाजपात गेल्याशिवाय पुणे-नाशिक रेल्वे होणार नाही का? असा त्यांचा प्रश्न होता. पण पुणे-नाशिक रेल्वेबाबत आमची सातत्याने मागणी आहे. हीच मागणी संगमनेर, जुन्नर, अकोला, मंचर अशा सगळ्यांची आहे.

त्यामुळे याबाबतच बोलताना मला एका पत्रकाराने विचारलं की तुम्ही भाजपात गेल्याशिवाय ही रेल्वे होणार नाही का? त्या प्रश्नावर माझा त्यांना प्रतिप्रश्न असा होता की, अशी काही ऑफर आहे का? जर तशी काही ऑफर रेल्वेच्या संदर्भात आली तर विचार करू. त्यामुळे माझं वक्तव्य फक्त रेल्वेच्या संदर्भात होतं. पण रेल्वेच्या संदर्भातील माझ्या वक्तव्याचा काही जणांनी वेगळा अर्थ काढण्याचा प्रयत्न केला", असं स्पष्टीकरण अमोल कोल्हे यांनी आज माध्यमांशी बोलताना दिलं आहे.

# सिया गोयल आणि चेतन चौधरीचा नवा स्नॅपचॅट व्हिडीओ समोर, 23 मे रोजी भेट झाल्याची माहिती

**मुंबई/वृत्तसंस्था**

केतन अग्रवाल या तरुणाची १८ जून रोजी पुण्यातल्या लोहगडावरुन ढकलून देत हत्या करण्यात आली. ही हत्या त्याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा बॉयफ्रेंड चेतन चौधरी यांनी केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात या दोघांना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश या प्रकरणाने हादरला आहे. तसंच या प्रकरणात रोज नवे नवे खुलासे समोर येत आहेत. सियाच्या आई वडिलांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत चेतन आणि सिया यांच्यात काही नातं आहे किंवा प्रेमसंबंध आहेत याची आम्हाला काहीही कल्पना नव्हती असं म्हटलं आहे. मात्र आता चेतन चौधरी आणि सिया गोयल यांचा स्नॅपचॅटवरचा एक व्हिडीओ समोर आला आहे. सिया गोयल आणि चेतन चौधरी या दोघांचा २३ मे रोजीचा एक व्हिडीओ समोर आला आहे असं सांगण्यात येतं आहे. या व्हिडीओत सिया आणि चेतन दोघंही रोमँटिक अंदाजात दिसत आहेत. याचाच अर्थ सिया आणि केतन यांचा फेब्रुवारीत साखरपुडा झाल्यानंतरही सिया आणि चेतन हे दोघंही संपर्कात होते आणि त्यांच्यात प्रेमसंबंध होते या चर्चांना बळ देणारा हा व्हिडीओ ठरला आहे. एनडीटीव्हीने यासंबंधीचं वृत्त दिलं आहे. तसंच सियाच्या कुटुंबाशीही त्यांनी संपर्क साधला, मात्र सियाच्या कुटुंबाने यावर बोलण्यास नकार दिला आहे. एनडीटीव्हीच्या वृत्तानुसारा हा व्हिडीओ २३ मे रोजीचा असून रात्री ९.३० ला पोस्ट करण्यात आला आहे. सिया आणि चेतन यांनी दोघांचेही हात हातात घट्ट पकडले असून दोघंही एकमेकांना प्रेमाने मिठी मारत आहेत असं या व्हिडीओत दिसून येतं आहे. केतन अग्रवालची हत्या झाली





त्याआधी तीन आठवड्यांपूर्वीचा हा व्हिडीओ आहे असं सांगण्यात येतं आहे. हा व्हिडीओ नेमका कधीचा आहे हे अद्याप समोर यायचं आहे. तसंच सिया आणि चेतन का भेटले होते हे कारणही समोर येणं बाकी आहे.

चेतन चौधरी आणि माझा मुलगा यांची ओळख झाली. त्यानंतर चेतन आणि सियाची ओळख झाली. या दोघांमध्ये कुठलेही प्रेमसंबंध नाहीत. हे दोघंही मित्र आहेत. तसंच केतनशी जेव्हा सियाचा साखरपुडा झाला त्यानंतर मी एकदाही हे पाहिलं नाही की तिने केतनला कधी टाळलं आहे. जर तिला चेतन आवडत असता तर तिच्या बोलण्यातून तसं काहीतरी समोर आलं असतं किंवा आई म्हणून मला ते कळलं असतं. पण तसं काहीही मला समजलेलं नाही. तसंच मला हे मुळीच वाटत नाही की चेतन आणि सिया यांचे प्रेमसंबंध होते असं सियाच्या आईने म्हटलं होतं. दुसरीकडे चेतन आणि सिया यांचे अनेक फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दरम्यान सियाच्या आई वडिलांनी हे देखील म्हटलं आहे की आमची मुलगी असं काही करेल हे वाटत नाही. पण तिने हे जर केलं असेल आणि कोर्टाने तिला शिक्षा सुनावली तर तिला ती शिक्षा भोगावीच लागेल. ती दोषी असेल तर तिला फाशी दिली तरीही आम्ही काहीही म्हणणार नाही असंही सियाच्या वडिलांनी म्हटलं आहे. ही त्यांची भूमिका समोर आलेली असतानाच आता स्नॅपचॅटवरचा हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

## चंद्रपुरात पुन्हा वाघाचा बळी! अंगावर विद्युत तार आढळल्याने शिकारीचा संशय बळावला

**नागपूर/वृत्तसंस्था**

राज्यात वाघांची संख्या वाढत असताना मानव-वाघ संघर्षाचे प्रमाणही वाढत आहे. या संघर्षाचा फटका आता थेट वाघांनाच बसू लागल्याची चिंताजनक बाब समोर आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यात मंगळवारी एक वाघ संशयास्पद परिस्थितीत मृतावस्थेत आढळून आला. वाघाच्या अंगावर विद्युत तार आढळल्याने वीजप्रवाह सोडून त्याची शिकार करण्यात आली असावी, असा दाट संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात पुन्हा वाघांच्या शिकारीची मालिका सुरू होण्याची भीती व्यक्त होत आहे.

सावली तालुक्यातील सिंदेवाही रोडवरील कन्हाळगावकडे जाणाऱ्या मार्गावर हा वाघ मृतावस्थेत आढळला. महिनाभरापूर्वी या परिसरात झालेल्या जोरदार वादळ आणि पावसामुळे अनेक वीजखांब कोसळले होते. परिणामी परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. मंगळवारी वीजवाहिन्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना कामगारांच्या निदर्शनास वाघाचा मृतदेह आला. विशेष म्हणजे वाघाच्या अंगावर विद्युत तार टाकलेली होती. वन विभागाच्या प्राथमिक माहितीनुसार, सोमवारी याच मार्गाने एका महिलेची ये-जा झाली होती. त्यावेळी तिला वाघाचा मृतदेह दिसला नव्हता. त्यामुळे वाघाचा मृत्यू सोमवारी रात्री किंवा मंगळवारी पहाटेच्या सुमारास झाला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

घटनास्थळावरील परिस्थिती अनेक प्रश्न निर्माण करणारी आहे. ज्या ठिकाणी वाघाचा मृतदेह आढळला, त्या परिसरात त्याच्या पाऊलखुणा आढळून आलेल्या नाहीत. त्यामुळे वाघाचा मृत्यू अन्यत्र झाला असावा आणि नंतर मृतदेह येथे आणून टाकण्यात आला असावा, अशी शक्यता तपास यंत्रणा पडताळून पाहत आहे. याशिवाय वाघाच्या अंगावर असलेल्या तारेला त्या वेळी विद्युत प्रवाह नव्हता. त्यामुळे वाघाचा मृत्यू झाल्यानंतर वीजपुरवठा बंद करण्यात आला की मृतदेह लपविण्याचा प्रयत्न झाला, याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. शेतातील पिकांचे नुकसान टाळण्यासाठी अथवा वन्यप्राण्यांना दूर ठेवण्यासाठी काही ठिकाणी बेकायदा विद्युत प्रवाह सोडलेल्या तारांचा वापर केला जातो.

## आसाममध्ये ५५ कोटींच्या ३७ किलो सोन्याचा मोठा साठा जप्त; सांगली जिल्ह्यातील अक्षय बनसोडेला अटक

### आसाम पोलिसांची सोन्याच्या तस्करीविरोधात कारवाई..

**गुवाहाटी/वृत्तसंस्था**

आसाम पोलिसांनी सोन्याच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करत तब्बल ५५ कोटी रुपयांहून अधिक किमतीचे ३७ किलो २४ कॅरेट सोन्याची बिस्किटे जप्त केली आहेत. या प्रकरणात महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील ३२ वर्षीय अक्षय बनसोडे याला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून चार मोबाईल फोन आणि १३ ग्रॅम चांदीही जप्त करण्यात आली आहे.

गुवाहाटीतील खारघुली परिसरात गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली. पोलिसांनी सांगितले की, संशयित व्यक्तीवर काही दिवसांपासून लक्ष ठेवण्यात आले होते. माहितीची खातरजमा झाल्यानंतर विशेष पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. तेव्हा अक्षय बनसोडे हा दोन बॅग घेऊन उभा असल्याचे आढळून आले. त्याची झाडाझडती घेतली असता बॅगमधून ३७ किलो २४ कॅरेट सोन्याची बिस्किटे सापडली.

याशिवाय आरोपीकडून १३ ग्रॅम चांदी आणि चार मोबाईल फोन जप्त करण्यात आले. त्यामध्ये दोन आयफोन आणि दोन अँड्रॉईड मोबाईलचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या सोन्याची बाजारातील किंमत ५५ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, अक्षय बनसोडे गेल्या दोन महिन्यांपासून गुवाहाटीत वास्तव्यास होता. प्राथमिक तपासात यापूर्वीही त्याने सुमारे २० किलो सोन्याची तस्करी केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याचे आंतरराष्ट्रीय सोन्याच्या तस्करीच्या रॅकेटशी काही संबंध आहेत का, याचाही सखोल तपास सुरू आहे.

आसाम पोलिसांनी ही राज्यातील आतापर्यंतची सर्वात मोठी सोन्याची जप्ती असल्याचा दावा केला आहे. या कारवाईमुळे सोन्याच्या तस्करीच्या मोठ्या जाळ्याचा पर्दाफाश होण्याची शक्यता असून, तपास यंत्रणा आरोपीच्या आर्थिक व्यवहारांसह त्याच्या इतर साथीदारांचाही शोध घेत आहेत.

## पंतप्रधान मोदींच्या चेहऱ्यासारखा मास्क घालून चोरट्याने घातला दरोडा

**नागपूर/वृत्तसंस्था**

पंतप्रधान मोदींच्या चेहऱ्यासारखा दिसणारा मास्क घालून दरोडा टाकण्याचा प्रकार राजस्थानच्या भिलवाडा जिल्ह्यात घडला आहे. या दरोड्याचे सीसीटीव्ही चित्रण समोर आले आहे. ज्यामध्ये एक चोर पंतप्रधान मोदींचा मास्क घालून चोरी करत होता. मातेश्वरी मोबाइल शॉप नावाच्या दुकानात चोरी करण्यात आली. सीसीटीव्हीमध्ये दिसत असल्यानुसार चोर छतावरून आत शिरले. त्यानंतर अनेक स्मार्टफोन घेऊन चोरट्याने पळ काढला.

मातेश्वरी दुकानाचे मालक लक्ष्मण सेन यांनी सकाळी दुकान उघडले असता त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. संपूर्ण दुकानात सामान अस्ताव्यस्त केलेले होते. तसेच मोबाइलचे अनेक बॉक्स गहाळ झाल्याचे सेन यांच्या लक्षात आले. सेन यांनी पाहणी केल्यानंतर सांगितले की, ४ ते ५ लाख रुपये किमतीचे ३० ते ४० मोबाइल चोरीला गेले होते.

दरोड टाकल्यानंतर दुकानदाराने दुकानाबाहेरील सीसीटीव्ही चित्रण सार्वजनिक केले आहे. ज्यात एक चोर पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मास्क परिधान केलेला दिसत आहे. कारेडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी पुरणमल मीणा यांना घटनेची मिळताच ते आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळाचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी चोरट्याचा माग काढण्यासाठी वेगवेगळी पथके तयार करून शोध सुरू केला आहे. दरम्यान या घटनेमुळे परिसरातील व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. चोरीसारख्या घटना टाळल्या जाव्यात यासाठी रात्री घातली जाणारी गस्त आणखी कडक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. कारेडा परिसरात त्याच रात्री आणखी एका मोबाइल दुकानात चोरी झाल्याचा प्रकार घडला आहे. सांवरीया मोबाइल शॉपमध्ये अशाचप्रकारे मास्क परिधान केलेल्या व्यक्तीने शटर तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला. त्याचाही सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आला आहे.



# सेरेना पराभूत, ओसाका तिसऱ्या फेरीत

## व्हेरेव्ह , स्वायटेक, रायबाकिना दुसऱ्या फेरीत : वावरिंका, शेल्टन स्पर्धेबाहेर

■ लंडन/वृत्तसंस्था

अमेरिकेचे माजी चॅम्पियन सेरेना विल्यम्सचे विम्बल्डनमधील बहुप्रतीक्षित पुनरागमन पहिल्याच फेरीतील पराभवाने संपुष्टात आले. तिचा खेळ पाहण्यासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. पण विम्बल्डनमधील पहिला अडथळा तिला पार करता आला नाही. ऑस्ट्रेलियाच्या माया जॉईटने तिला तीन सेट्समध्ये पराभूत केले. जर्मनीचा अलेक्झांडर व्हेरेव्ह, झेक प्रजासत्ताकचा याकुब मेन्सिक, पोलंडची इगा स्वायटेक, कझाकची इलेना रायबाकिना यांनी संघर्षपूर्ण विजय मिळवत दुसरी फेरी गाठली तर जपानच्या नाओमी ओसाकाने तिसऱ्या फेरीत स्थान मिळविले. बेन शेल्टन, वावरिंका यांचे आव्हान समाप्त झाले.

वाईल्ड कार्ड प्रवेश मिळालेल्या सेरेना विल्यम्सने चार वर्षानंतर पुनरागमन केले. तिने जॉईटविरुद्ध संघर्षही केला. पण अखेर तिला 6-3, 6-7 (6-8), 6-3 असा पराभव स्वीकारावा लागला. पराभूत झाल्याने 44 वर्षीय सेरेनाला विम्बल्डनमध्ये एकेरीत विजय मिळविणारी सर्वात वयस्कर खेळाडू होण्याची तिची संधी हुकली. यापूर्वी 2004 मध्ये मार्टिना नवरातिलोव्हाने हा पराक्रम केला होता. प्रेक्षकांनी सेरेनाचे टाळ्या वाजवून जोरदार स्वागत केले आणि नंतर कोर्टवरून परततानाही तिला मानवंदना दिली. जॉईटची पुढील लढत फिलिपिन्सच्या 29 व्या मानांकित अलेक्झांड्रा इआलाशी होईल. जपानच्या नाओमी ओसाकाने एकेरीची तिसरी फेरी गाठताना रशियाच्या ॲनास्तेशिया गॅसानोव्हाचा 6-3, 6-2 असा पराभव केला. पुरुष एकेरीत 29 वर्षीय व्हेरेव्हला ब्लॉक्सने विजयासाठी संघर्ष करायला भाग पाडले. मागील वर्षी पहिल्याच फेरीत पराभूत झालेला व्हेरेव्ह यावेळी ब्लॉक्सवर 6-4, 6-7 (8-10), 7-6 (7-5), 7-6 (7-0) अशी मात करून दुसरी फेरी गाठली. विम्बल्डनमध्ये व्हेरेव्हला चौथ्या फेरीच्या पुढे मजल मारता आलेली नाही. अल्कारेझ नसल्याने यावेळी अंतिम



फेरी गाठण्याची त्याला संधी आहे. त्याची दुसऱ्या फेरीत फ्रान्सच्या व्हॅलेन्टिन रॉयरशी होईल. झेकच्या मेन्सिकलाही विजयासाठी संघर्ष करावा लागला. त्याने ब्रिटनच्या टॉबी सॅम्युएलचा 5-7, 6-3, 6-3, 3-6, 7-6 (7-9) असा पराभव केला. स्वित्झर्लंडच्या 41 वर्षीय स्टॅनिसलास वावरिंकाचे आव्हान पहिल्याच फेरीत इटलीच्या मॅटेव बेरेटिनीने 6-7 (9-7), 7-6 (18-16), 7-6 (9-7), 7-6 (7-5) असे संपुष्टात आणले. विम्बल्डनमधील शेवटच्या सहभागानंतर वावरिंकाने चाहत्यांना अभिवादन करीत निरोप घेतला. अमेरिकेच्या बेन शेल्टनलाही पहिल्याच फेरीत स्पर्धेबाहेर पडावे लागले. फिनलंडच्या पात्रता फेरीतून आलेल्या ओटो व्हटनिनने शेल्टनचा 6-4, 3-6, 6-7 (8-10), 6-2, 7-6 (11-9) असा पाच सेट्सच्या झुंजार लढतीत पराभव केला.

महिला एकेरीच्या अन्य सामन्यात विद्यमान विजेत्या व तिसऱ्या मानांकित इगा स्वायटेकलाही विजयासाठी झगडावे लागले. दुसरी फेरी गाठताना तिने अमेरिकेच्या टेलर टाऊनसेंडवर 6-1, 2-6, 6-3 अशी मात केली. तिसऱ्या सेटमधील पहिला गेम दीर्घ काळ चालला. त्याते दहा वेळा ड्यूस झाले होते. अखेर तिने बिनतोड सर्व्हिस करीत सामना संपवला. दुसरे मानांकन असलल्या व 2022 ची चॅम्पियन इलेना रायबाकिनालाही संघर्ष करावा लागला.

फ्रान्सच्या पदार्पण करणाऱ्या लोइ बॉइसनवर तिने 6-4, 1-6, 6-3, अशी मात केली. गेल्या वर्षी उपविजेतेपद मिळविलेल्या अमांदा ॲनिसिमोव्हाने ग्रँडस्लॅममध्ये विजयी पुनरागमन करताना पात्रता फेरीतून आलेल्या लिना गोरचेस्काचा 6-3, 6-2 असा पराभव केला. तिची पुढील लढत पेत्र मार्सिन्को किंवा सोफिया केनिन यापैकी एकीशी होईल.

# मेक्सिको 40 वर्षांनंतर बाद फेरीत विजयी

## ज्युलियन क्विनोनेस, राउल जिमेनेझ यांनी नोंदवले गोल

■ मेक्सिको सिटी/वृत्तसंस्था

मेक्सिकोसाठी 40 वर्षांची प्रतीक्षा संपली आहे. विश्वचषकाच्या बाद फेरीत पराभव पचवण्याची मेक्सिकन चाहत्यांना सवय झाली होती. या टप्प्यावर मेक्सिकोच्या चाहत्यांना सात वेळा निराशा आणि दुःखाचा सामना करावा लागला होता. पण आता चित्र बदलले आहे. मंगळवारी रात्री खेळल्या गेलेल्या सामन्यात ज्युलियन क्विनोनेस आणि राउल जिमेनेझ यांनी पहिल्या सत्रात अवघ्या नऊ मिनिटांच्या अंतराने गोल केले. यामुळे मेक्सिकोने इक्वेडोरचा 2-0 असा पराभव केला आणि बाद फेरीतील चार दशकांचा दुष्काळ संपवत 16 संघांच्या फेरीमध्ये धडक मारली.



मेक्सिकोचे प्रशिक्षक झेवियर ॲग्युरी हे 1986 च्या त्या संघात सुरुवातीच्या मिडफील्डर्सपैकी एक होते. 'हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे कारण मी अशा खेळाडूंपैकी एक होतो ज्यांना बाद फेरीत पुढे जाता आले नव्हते. आम्ही आता 16 संघांच्या फेरीमध्ये आहोत आणि चाहत्यांशी आमचे एक उत्तम नाते निर्माण होत आहे. आम्ही एका कुटुंबासारखे आहोत. हे खरोखरच अद्भूत आहे', असे ॲग्युरी म्हणाले. 1994 ते 2018 या काळात मेक्सिकोला याच टप्प्यावर सलग सात वेळा पराभवाचा सामना करावा लागला होता आणि 2022 मध्ये तर ते गट फेरीच्या पुढे जाऊ शकले नव्हते. या स्पर्धेतील तिसऱ्या गोलमुळे क्विनोनेस हा विश्वचषकाच्या इतिहासात मेसिक्कोसाठी सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत लुईस हनडिझ आणि झेवियर हनडिझ (प्रत्येकी चार गोल) यांच्यापाठोपाठ संयुक्तपणे दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. गेल्या हंगामात सौदी प्रो लीगमध्ये सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरलेला क्विनोनेस मेक्सिकोच्या आघाडीफळीतनवी ऊर्जा घेऊन आला आहे. या उर्जेची कमतरता मागील विश्वचषकांमध्ये जाणवत होती. दुसरीकडे, जिमेनेझने या स्पर्धेतील आपला दुसरा गोल केला. राष्ट्रीय संघासाठी त्याचे एकूण 47 गोल झाले असून त्याने जेरेड बोर्गेटीशी असलेली बरोबरी मोडली आहे. मेक्सिकोसाठी सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत हनडिझशी बरोबरी करण्यासाठी त्याला आता आणखी पाच गोलची गरज आहे. मेक्सिकोचा पुढील सामना रविवारी होईल. हा सामना इंग्लंड आणि काँगो यांच्यात होणाऱ्या सामन्यातील विजेत्या संघाविरुद्ध खेळला जाईल.

# फ्रान्सकडून स्वीडनचे आव्हान संपुष्टात

■ लंडन/वृत्तसंस्था



2026 च्या विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत पुरूषांच्या विभागात इटलीचा विद्यमान विजेता जेनिक सिनर, सर्बियाचा माजी टॉपसिडेड नोव्हॅक जोकोविच, तसेच महिलांच्या विभागात बेल्जियमची आर्यना साबालेंका, रशियाची मायरा अँड्रिव्हा, ॲनिसिमोव्हा, अमेरिकेची कोको गॉफ, जपानची नाओमी ओसाका, अमेरिकेची जेसिका पेगुला यांनी विजयी सलामी दिली. पुरूषांच्या विभागात रशियाचा 12 वा मानांकीत आंद्रे रुबलेव, पोलंडची माया श्वालिन्स्का व मॅग्डा लिनेट यांचे आवाहन पहिल्याच फेरीत समाप्त झाले.

पुरूषांच्या विभागातील पहिल्या फेरीतील सामन्यात इटलीच्या विद्यमान विजेत्या जेनिक सिनरला विजयासाठी 5 सेट्समध्ये झगडावे लागले. या सामन्यात सिनरने केसमानोव्हीचचा 4-6, 6-3, 6-7 (6-8), 6-2, 6-3 अशा सेट्समध्ये पराभव केला. हा सामना सुमारे साडेतीन तास चालला होता. पुरूषांच्या विभागातील अन्य एका सामन्यात सर्बियाच्या जोकोविचने चीनच्या यु इलेकचा 6-4, 5-7, 6-4, 6-4 असा पराभव करत विजयी सलामी दिली. मात्र रशियाच्या बाराव्या मानांकीत आंद्रे रुबलेवचे आव्हान पहिल्याच फेरीत रोमन सैफुलीनने संपुष्टात आणले. सैफुलीनने झुंजार लढतीत रुबलेवचा 6-4, 6-7 (6-8), 3-6, 6-3, 7-6 (12-10) असा पराभव केला. पहिल्या फेरीतील अन्य एका सामन्यात स्पेनच्या राफेल जोडारने या स्पर्धेत पहिल्यांदाच आपला सहभाग दर्शविताना फेलिक्स गिलचे आव्हान 6-3, 6-3, 7-5 असे संपुष्टात आणले. महिलांच्या विभागात बेल्जियमच्या आर्यना साबालेंकाने विजयी सलामी देताना कोस्टोव्हिकचा 6-2, 6-3 अशा सरळ सेटमध्ये फडशा पाडला. ब्रिटनच्या केटी बोल्टरला पहिल्याच फेरीत तायरा ग्रँटकडून 6-4, 6-2 अशा सेट्समध्ये हार पत्करावी लागली. इमा राडुकानू आणि जॅक ड्रेपर यांनी सोमवारी पहिल्याच दिवशी दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घेतली.

# हालांदाच्या गोलामुळे नॉर्वेची आयव्हरी कोस्टवर २–१ ने मात

## विश्वचषकाच्या बाद फेरीतील पहिलाच विजय

■ आर्लिंग्टन, टेक्सास/वृत्तसंस्था

नॉर्वेने विश्वचषकात पहिल्यांदाच बाद फेरीतील सामना जिंकल्यानंतर अर्लिंग हालांदने त्या क्षणाचा आनंद लुटला. मंगळवारी झालेल्या सामन्यात 86 व्या मिनिटाला हालांदने डाव्या पायाने मारलेल्या एका हलक्या फटक्यामुळे निर्णायक फरक पडला आणि नॉर्वेने आयव्हरी कोस्टचा 2-1 असा पराभव केला. या विजयामुळे आता त्यांची गाठ पाच वेळा विश्वविजेतेपद पटकावणाऱ्या ब्राझीलशी पडणार आहे. ज्याला नॉर्वेजियन लोक आतापर्यंतचा सर्वात महान विजय मानतात त्याच्यानंतर 28 वर्षांनी हा सामना होणार आहे.

पहिल्या सत्रात आंतोनियो नुसाने 'कर्लिंग किक'द्वारे नॉर्वेसाठी पहिला गोल केला. आपल्या चौथ्या विश्वचषकात खेळणारा नॉर्वेचा संघ आता उपउपांत्यपूर्व फेरीमध्ये रविवारी ईस्ट रदरफोर्ड, न्यू जर्सी येथील मेटलाइफ स्टेडियमवर ब्राझीलचा सामना करणार आहे. 1998 नंतर नॉर्वेचा हा पहिलाच विश्वचषक सहभाग आहे. त्यावेळच्या स्पर्धेत साखळी फेरीतील शेवटच्या सामन्यात तत्कालीन विश्वविजेत्या ब्राझीलविरुद्ध 83 व्या आणि 89 व्या मिनिटाला गोल करून नॉर्वेने 2-1 असा अविश्वसनीय विजय मिळवला होता आणि बाद फेरीत प्रवेश केला होता.

दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला नॉर्वेला दोन गोलांची आघाडी घेण्यापासून रोखणाऱ्या अमाद डियालोने 74 व्या मिनिटाला डाव्या पायाने चेंडू फटकावून गोल करत आयव्हरी कोस्टसाठी सामना बरोबरीत आणला. हालांदने आघाडी मिळवून देणारा केलेला गोल हा त्याच्या 53 सामन्यांमधील 60 वा गोल होता आणि नॉर्वेसाठी तो एक विक्रम आहे. हा गोल होऊनही आयव्हरी कोस्टने



दबाव कायम ठेवला. 'स्टॉपेज टाइम'च्या सहाव्या मिनिटाला डियालोला थेट फ्री-किकद्वारे सामना बरोबरीत आणण्याची संधी मिळाली होती. परंतु ओरजान नायलँडने हवेत झेप घेत चेंडू अडवला., हा त्याचा चौथा बचाव ठरला.

संपूर्ण सामना खेळलेल्या नॉर्वेच्या खेळाडूंमध्ये हालांदने चेंडूला सर्वात कमी वेळा (27 वेळा) स्पर्श केला होता. मात्र पॅट्रिक बर्ग चेंडूसह पेनल्टी एरियामध्ये शिरला आणि त्याने जलद पास दिला तेव्हा तीन बचावपटू त्याच्याकडे वळल्यामुळे हालांद मोकळा राहिला. हालांदच्या पायाला लागून चेंडू हळूच गोल-लाइन ओलांडून आत गेला. या स्पर्धेतील तीन सामन्यांमधील हालांदचा हा पाचवा गोल आहे. हा आकडा लायेनेल मेस्सीपेक्षा एकाने कमी आहे.


नुसाने 39 व्या मिनिटाला आपला पहिला विश्वचषक गोल केला. त्याने पेनल्टी क्षेत्राच्या डाव्या कोपऱ्यातून काही पावले पुढे जात दोन बचावपटूंच्या मधून उजव्या पायाने चेंडू फटकावला. आयव्हरी कोस्टचा गोलरक्षक याहिया फोफानाने चेंडू अडवण्यासाठी झेप घेतली, परंतु चेंडू त्याच्या हाताच्या आवाक्याबाहेर होता. हवेत झेपावलेला असतानाच त्याने मागे वळून पाहिले तेव्हा चेंडू वळण घेत जाळीत शिरला होता. निकोलस पेपेसोबत चेंडूची देवाणघेवाण केल्यानंतर डियालोने गोल करून सामना 1-1 असा बरोबरीत आणला. पेपेने मागील सामन्यात आयव्हरी कोस्टचे दोन्ही गोल केले होते, मात्र या सामन्यात 55 व्या मिनिटाला नायलँडने त्याला रोखले.

# ‘ईठा’ चित्रपटात त्यांचं खरं नाव का वापरलं नाही? वादानंतर अभिनेत्याने सांगितलं कारण

हिंदी श्रद्धा कपूरच्या आगामी ‘ईठा’ या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला. दिग्गज लावणी कलाकार विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित असलेला हा चित्रपट वादात सापडला आहे, कारण त्यांच्या कुटुंबाने चित्रपटाच्या नावावर आक्षेप घेतला. विठाबाईंचं नाव चित्रपटाच्या शीर्षकातून का वगळलं असा प्रश्न त्यांनी विचारला आणि या नामवंत लोककलावंताला योग्य सन्मान देण्यासाठी नाव बदलण्याची मागणी केली.

या वादावर ‘ईठा’ चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारणारा अभिनेता अनंत जोशीने प्रतिक्रिया दिली आहे. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर आणि निमति दिनेश विजान यांनी चित्रपटासाठी विठाबाईंचं मूळ नाव का वापरलं नाही, याचं कारण त्याने सांगितलं. ‘झूम’शी बोलताना तो म्हणाला, “सध्या आपण ज्या काळात जगतोय, ते पाहता मॅडॉक फिल्म्स आणि लक्ष्मण सर स्वतःला कोणत्याही वादापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. जेव्हा तुम्ही खऱ्या व्यक्तींची आणि त्यांची खरी नावं वापरता, तेव्हा बरेचदा वाद निर्माण होतात. त्यामुळे सुरुवातीला हा वाद टाळणं एवढाच त्यामागचा उद्देश होता.”






पुढे जोशी म्हणाला, “पण या प्रकरणात, जर कुटुंब खरं नाव वापरू देण्यास तयार असेल, तर ते चित्रपटाच्या फायद्याचंच ठरेल. कुटुंब किंवा इतर कोणालाही खरं नाव वापरल्यास आक्षेप नाही, यामुळे चित्रपटाची विश्वासार्हता वाढेल. कारण निर्मात्यांनी ही कथा ज्याची आहे, त्यांना श्रेय दिलंच आहे.”

विठाबाई नारायणगावकर यांच्या कुटुंबाने आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (NCP) या चित्रपटाच्या नावावर आक्षेप घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या चित्रपट आणि सांस्कृतिक विभागाने चित्रपटाचं नाव विठाबाईंच्या नावावरून का नाही ठेवलं, असा प्रश्न त्यांनी विचारला. तसेच विठाबाईंचा वारसा जपणं आणि त्यांचा आदर व्हायला हवा आणि चित्रपटाच्या नावातून लावणी आणि तमाशा क्षेत्रातील त्यांचं अथांग योगदान दिसून यायला हवं, असं त्यांनी म्हटलं. पाटील यांनी ‘एनडीटीव्ही’शी बोलताना सांगितलं की, त्यांचा आक्षेप चित्रपटाला नसून फक्त त्याच्या नावाला आहे. “विठाबाई नारायणगावकर या आधीच राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळालेल्या कलाकार आणि राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या होत्या. ग्रामीण महाराष्ट्रात लोक त्यांना प्रेमाने ‘ईठा’ म्हणायचे. एक मोठं प्रोडक्शन हाऊस, लक्ष्मण उतेकर यांच्यासारखे नावाजलेले दिग्दर्शक आणि श्रद्धा कपूर एकत्र येऊन एवढा मोठा आणत आहेत. त्यामुळे संपूर्ण भारतातील आणि अगदी जगभरातील लोकही हा चित्रपट पाहतील. त्यामुळे जर त्यांचं मूळ नाव वापरलं तर ते आणखी चांगलं होईल,” असं ते म्हणाले. तसेच चित्रपटाचे नाव ‘ईठा’ ठेवल्यामुळे पुढच्या पिढीचा गोंधळ उडू शकतो. भविष्यात कोणाला त्यांच्याबद्दल माहिती हवी असेल तर ते ‘विठाबाई’ ऐवजी ‘ईठा’ नावाने शोधतील.

## रणबीरच्या ‘रामायण’मधील क्लिप लीक?

रणबीर कपूरचा बहुप्रतीक्षित चित्रपट ‘रामायण’ पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. चित्रपटाच्या शूटिंग दरम्यानचा एक व्हिडीओ लीक झाला आहे, जो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. व्हायरल व्हिडीओत ‘रामायण’ महाकाव्यातील एका लढाईच्या दृश्याचा सीन पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावर अनेक लोकांनी हा व्हिडीओ शेअर केला आहे.



व्हायरल व्हिडीओत रणबीर कपूर भगवान श्री रामाच्या राजेशाही अवतारात दिसत आहे; तो एका मोठ्या राक्षसाला मारण्यासाठी धनुष्य बाण सोडतो आणि स्फोट होतो. अनेक ऑनलाइन पोस्ट्सनुसार, ही क्लिप निर्मात्यांनी चित्रपट प्रदर्शनापूर्वी आयोजित केलेल्या चाहत्यांसाठीच्या विशेष प्रदर्शनादरम्यान किंवा प्रचार कार्यक्रमादरम्यान रेकॉर्ड केली असावी. हे लक्षात घेणे गरजेचे आहे की या फुटेजची सत्यता अद्याप पडताळलेली नाही. मात्र ही क्लिप प्रचंड व्हायरल होत आहे.

‘रामायण’च्या या व्हायरल व्हिडीओवर अनेक नेटकरी कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. अनेक सोशल मीडिया वापरकर्त्यांच्या मते ही क्लिप ‘एआय’ (AI) प्रॉम्प्ट्स वापरून तयार केली असावी. तर इतर लोक या व्हिडीओवर भरभरून कमेंट्सचा पाऊस पाडत आहेत. एका युझरने लिहिले, “रामायणात कोणत्या प्रकारचा राक्षस होता?” दुसऱ्याने लिहिलं की, “मला ‘आदिपुरुष’ची आठवण येत आहे, 1200 कोटींचा आदिपुरुष...”

‘रामायण’ हा चित्रपट नितेश तिवारी दिग्दर्शित आहे. २०१७ मध्ये या ‘रामायण’ची घोषणा करण्यात आली होती. ‘रामायण’ चित्रपटाचा पहिला भाग यावर्षी २०२६ च्या दिवाळीला तर दुसरा भाग २०२७ च्या दिवाळीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. रामायणात मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामाची भूमिका रणबीर कपूर साकारणार आहे.

## ३३ वर्षीय अभिनेत्याने साकारली १६ वर्षांच्या मुलाची भूमिका

बॉलिवूडचा नवाब सैफ अली खान सध्या त्याच्या ‘कर्तव्य’ चित्रपटामुळे चांगलाच चर्चेत आहे. ‘कर्तव्य’ मध्ये सैफ अली खान पोलीसांच्या भूमिकेत दिसत आहेत. या चित्रपटात अभिनेता युधवीर अहलावत झळकला. त्याने चित्रपटात ‘हरपाल’ हे पात्र साकारले जे किशोरवयीन मुलाचे आहे. अनेकांना हा युधवीर अहलावत खऱ्या आयुष्यातही लहान किशोरवयीन मुलगा वाटला, मात्र तसेच नसून तो ३३ वर्षांचा पुरुष आहे. अभिनेता सैफ अली खान देखील युधवीरला सुरूवातीला लहान मुलगा समजला होता.

मुलाखतीत युधवीर म्हणाला की, मला खूपच छान वाटतंय. लोकांना माझं काम आवडलं आहे, असे मेसेजेस ते मला पाठवत आहेत. मी याच दिवसाची वाट पाहत होतो. मी सतत प्रत्येकाच्या मेसेजेसना (DMs) उत्तर देत आहे.रेड चिलीजसोबत काम करण्याची ही माझी दुसरी वेळ आहे आणि अनुभव खूपच छान होता. मुकेश छाब्रा यांच्या टीमकडून मला फोन आला की ते ‘कर्तव्य’ नावाच्या चित्रपटासाठी कास्टिंग करत आहेत आणि त्यांना ‘हरपाल’च्या भूमिकेसाठी माझी ऑडिशन घ्यायची आहे. मी ऑडिशन दिली आणि एक-दोन टेक्सनंतर त्यांनी मला सांगितले की, मी चांगली कामगिरी केली आहे. कुठेतरी मलाही वाटले होते की हा चित्रपट मीच करेन. एका आठवड्यानंतर, मला रेड चिलीजकडून फोन आला आणि त्यांनी सांगितले की या भूमिकेसाठी माझी निवड झाली आहे.” “मी तरुण दिसतो म्हणून माझे कौतुक व्हायचे, विशेषता महिला चाहत्यांकडून... ती लोक मला क्यूट बोलायचे. एका मुलाखतीत सैफ सरांना चित्रपटातील त्यांच्या आवडत्या दृश्याबद्दल विचारण्यात आले होते. त्यांनी



माझे कौतुक करताना म्हटले, ‘हरपाल खूप छान काम करतो. मी त्याच्यासोबत १६ वर्षांचा मुलगा समजून वागायचो. पण मग पुलकित सरांनी (दिग्दर्शक) सांगितले की मी प्रत्यक्षात ३३ वर्षांचा आहे. हे ऐकून त्यांना धक्काच बसला.’ ती क्लिप खूप व्हायरल झाली होती...” शेवटी युधवीर म्हणाला की, “सुरुवातीला सगळे माझ्याशी एखाद्या बालकलाकारासारखेच वागायचे. नंतर पुलकित सरांनी सर्वांना सांगितले की मी प्रत्यक्षात ३३ वर्षांचा आहे. त्यानंतर संजय मिश्रा सर आणि इतर लोकांनी माझ्याशी एखाद्या प्रौढ कलाकाराप्रमाणे वागायला सुरुवात केली...”

# ९ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेला सिनेमा ठरलेला फ्लॉप; आता जगभरात रचला विक्रम, अभिनेत्री आहे प्रमुख भूमिकेत


काही सिनेमे प्रदर्शित झाल्यानंतर बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरतात; मात्र कालांतराने अशा सिनेमांना मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळताना दिसते. या यादीत २०१७ मध्ये प्रदर्शित झालेल्या एका सिनेमाचा समावेश आहे.

२०१७ मध्ये जया जानकी नायक हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. या सिनेमात अभिनेत्री रकुल प्रीत सिंह आणि बेलमकोंडा साई श्रीनिवास यांनी प्रमुख भूमिका साकारली होती. मात्र, त्यावेळी हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉफ ठरला होता. आता मात्र हा सिनेमा एकदा चर्चेत आला आहे. त्याचे कारण म्हणजे जया जानकी नायक या सिनेमाने एक नवीन रेकॉर्ड तयार केला आहे.

हा भारतीय चित्रपट यूट्यूबवर एक अब्ज व्ह्युजचा टप्पा गाठणारा जगातील पहिला चित्रपट ठरला आहे. PSY च्या ‘गंगनम स्टाईल’ म्युझिक व्हिडीओने हा टप्पा सर्वप्रथम ओलांडला आहे. मात्र, चित्रपटांच्या बाबतीत ‘जया जानकी नायक’च्या नावावर हा विक्रम आहे. काही सिनेमे प्रदर्शित झाल्यानंतर बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरतात; मात्र कालांतराने अशा सिनेमांना मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळताना दिसते. या यादीत २०१७ मध्ये प्रदर्शित झालेल्या एका सिनेमाचा समावेश आहे.

२०१७ मध्ये जया जानकी नायक हा





सिनेमा प्रदर्शित झाला होता. या सिनेमात अभिनेत्री रकुल प्रीत सिंह आणि बेलमकोंडा साई श्रीनिवास यांनी प्रमुख भूमिका साकारली होती. मात्र, त्यावेळी हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉफ ठरला होता. आता मात्र हा सिनेमा एकदा चर्चेत आला आहे. त्याचे कारण म्हणजे जया जानकी नायक या सिनेमाने एक नवीन रेकॉर्ड तयार केला आहे. हा भारतीय चित्रपट यूट्यूबवर एक अब्ज व्ह्युजचा टप्पा गाठणारा जगातील पहिला चित्रपट ठरला आहे. PSY च्या ‘गंगनम स्टाईल’ म्युझिक व्हिडीओने हा टप्पा सर्वप्रथम ओलांडला आहे. मात्र, चित्रपटांच्या बाबतीत ‘जया जानकी नायक’च्या नावावर हा विक्रम आहे. कामाच्या आघाडीवर असताना दिग्दर्शक श्रीनू यांनी ‘अखंड 2’ दिग्दर्शित केला. रकुल प्रीत सिंग नुकतीच ‘पति पत्नी और वो दो’मध्ये दिसली होती. या चित्रपटात आयुष्मान खुराना, वामिक गब्बी व सारा अली खान यांच्याही भूमिका आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : आवश्यक कागदपत्रे वेळेत तयार ठेवा; लाभ मिळविण्याची प्रक्रिया जाणून घ्या

बुलढाणा/बुलढाणा

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांना सुलभ, पारदर्शक आणि वेळेत मिळावा यासाठी शासनाने निश्चित कार्यपद्धती आखली आहे. योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याबरोबरच बँकेतील कर्ज खात्याची माहिती अचूक असल्याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. योजनेबाबत शासन वेळोवेळी आवश्यक सूचना प्रसिद्ध करीत असून, लाभासाठी स्वतंत्र अर्ज आवश्यक आहे किंवा नाही, याबाबतचे निर्देशही स्वतंत्रपणे दिले जात आहेत. मात्र, लाभ वितरणाची प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी संबंधित बँकेकडे असलेली शेतकऱ्यांची माहिती अद्ययावत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी शेतकऱ्यांनी सर्वप्रथम आपल्या कर्ज खात्याचा तपशील संबंधित बँकेत तपासून घ्यावा. कर्जाचा प्रकार, कर्जाची रक्कम, खाते क्रमांक, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक तसेच इतर आवश्यक माहिती बँकेच्या नोंदीत अचूक असल्याची खात्री करून घ्यावी. योजनेचा लाभ मिळण्यासाठी आधार कार्ड, आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक, बँक पासबुक अथवा कर्ज खात्याचा तपशील, पीक कर्ज मंजुरीची माहिती किंवा कर्ज खाते क्रमांक, सातबारा उतारा (७/१२), आवश्यकतेनुसार आठ-अ उतारा (८अ), नोंदणीची माहिती, ई-केवायसी पूर्ण झाल्याची नोंद तसेच बँकेने मागितलेली इतर आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. या योजनेत आधार प्रमाणीकरण आणि यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी अद्याप वर नोंदणी केलेली नाही, त्यांनी ती तातडीने पूर्ण करावी. तसेच आधारशी मोबाईल क्रमांक जोडलेला असल्याची खात्री करून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी. योजनेची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, संबंधित बँका आणि शासनाच्या यंत्रणांकडून पात्र कर्ज खात्यांची पडताळणी केली जाईल. त्यानंतर माहितीची छाननी करून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येईल आणि शासनाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. शेतकऱ्यांनी आपल्या बँकेशी नियमित संपर्क ठेवावा. बँकेकडून आवश्यक असल्यास अतिरिक्त माहिती किंवा कागदपत्रांची मागणी करण्यात आल्यास ती तातडीने सादर करावी. त्यामुळे लाभ वितरणाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि सुलभ होण्यास मदत होईल. तसेच कोणत्याही अफवा किंवा अप्रमाणित संदेशांवर विश्वास न ठेवता शासन, संबंधित बँका, कृषी विभाग आणि महसूल यंत्रणेकडून देण्यात येणाऱ्या अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे. आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण केल्यास पात्र शेतकऱ्यांना या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ सहजपणे मिळू शकणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनर्बांधणीसाठीचा महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र शेतकऱ्याने आवश्यक कागदपत्रे तयार ठेवून, माहिती अद्ययावत करून आणि शासनाच्या सूचनांचे पालन करून या योजनेचा लाभ घेण्यासाठी सज्ज राहणे गरजेचे आहे.

# साखरखेर्डा येथे अपर तहसीलदार कार्यालय प्रस्तावित; सूचना व हरकती मागविल्या

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील प्रशासकीय सेवा अधिक प्रभावी व नागरिकाभिमुख करण्याच्या उद्देशाने साखरखेर्डा येथे नवीन अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन असून, या कार्यालयाच्या निर्मिती तसेच कार्यक्षेत्र निश्चितीबाबत नागरिकांकडून सूचना, हरकती व आक्षेप दि. ८ जुलैपर्यंत मागविण्यात आले आहेत. नागरिकांनी निर्धारित मुदतीत सूचना व हरकती सादर करून प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण होण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दि. २३ जून २०२६ रोजीच्या निर्देशानुसार नवीन कार्यालयांची मुख्यालये व कार्यक्षेत्र निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार साखरखेर्डा येथे अपर तहसीलदार कार्यालय प्रस्तावित करण्यात आले असून, या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात शेंदुर्जन व साखरखेर्डा या दोन महसूल मंडळांचा समावेश करण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावानंतर सिंदखेडराजा तहसीलअंतर्गत कार्यरत असलेल्या मूळ तहसीलदार कार्यालयाकडे सिंदखेडराजा, सोनोशी, किनगाव राजा, दुसरबीड आणि मलकापूर पांग्रा ही पाच महसूल मंडळे राहणार आहेत. सध्या सिंदखेडराजा तहसीलअंतर्गत एकूण सात महसूल मंडळांचा समावेश असून, प्रस्तावित पुनर्रचनेनंतर त्यापैकी दोन मंडळे नव्या अपर तहसीलदार कार्यालयाकडे वर्ग करण्यात येणार आहेत. प्रस्तावित अपर तहसीलदार कार्यालयाची निर्मिती अथवा कार्यक्षेत्र निश्चितीबाबत कोणाला काही सूचना, हरकती किंवा आक्षेप असल्यास ते लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत, म्हणजेच दि. ८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत, संबंधितांनी आपल्या सूचना व हरकती उपविभागीय अधिकारी कार्यालय, सिंदखेडराजा येथे लेखी स्वरूपात सादर कराव्यात. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती अथवा आक्षेपांचा विचार केला जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पाणी टंचाई निवारणार्थ देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा गावासाठी टँकर मंजूर




जनसंचलन-बुलढाणा

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली. अंढेरा येथे ३९३२ पशुधन व ८८७० लोकसंख्येसाठी तीन टँकरद्वारे २ लाख ४५ हजार ६३५ लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# संत मुक्ताई पालखी मार्गावर वारकऱ्यांसाठी आरोग्य विभाग सज्ज

जनसंचलन/बुलढाणा

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत मुक्ताई पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना अखंड, तातडीची आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले आहे. अंढेरा फाटा ते देऊळगाव माही या पालखी मार्गावर आरोग्य उपचार केंद्रे, रुग्णवाहिका, फिरती वैद्यकीय पथके, आरोग्यदूत, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच रोगप्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले यांच्या नियोजनानुसार आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सदानंद बन्सोड यांच्या सूचनेनुसार संपूर्ण तालुक्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे. पालखी मार्गावरील आरोग्य पथकांकडून वारकऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी, आवश्यक औषधोपचार, आपत्कालीन वैद्यकीय सेवा तसेच उष्माघात, संसर्गजन्य व पाणीजन्य आजारांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला त्वरित प्रतिसाद देता यावा यासाठी रुग्णवाहिका आणि प्रशिक्षित आरोग्य कर्मचारीही सज्ज ठेवण्यात आले आहेत. या सेवेमध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानंद शिंगाडे, डॉ. मयुरी पाडुळे, समुदाय आरोग्य अधिकारी वैभव लहाने, डॉ. सीमा जाधव, तालुका आरोग्य सहाय्यक प्रभाकर लबडे, गजानन नागरे, शिवाजी वाघ, यश चांदुरे, सुयश वाघमारे, अंकुश डोके, विजय झिने, आरोग्य सेविका संगीता पराड, ॲम्बुलन्स चालक देवानंद खराडे तसेच आशा स्वयंसेविका वर्षा नागरे प्रत्यक्ष पालखी मार्गावर कार्यरत असून वारकऱ्यांना आवश्यक आरोग्य सेवा पुरवत आहेत. वारकऱ्यांना सुरक्षित, निरोगी आणि सुखकर वारीचा अनुभव मिळावा, यासाठी आरोग्य विभागाकडून सर्व आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागाने दिली आहे.



# विठूरायांच्या भेटीची लागली ओढ भरपावसात टाळ-मृदंगाचा गजर; देऊळगाव महीत संत मुक्ताबाईंच्या पालखीचे जल्लोषात स्वागत!



**जनसंचलन-देऊळगाव मही**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विठूरायांच्या भेटीसाठी निघालेल्या आदीशक्ती संत मुक्ताबाईंच्या पालखीचे देऊळगाव महीत गुरुवारी दुपारी भक्तिमय वातावरणात आगमन झाले. भरपावसात टाळ-मृदंगाचा निनाद, ङ्क्ष्ङ्क्ष्मुक्ताबाई मुक्ताबाई विठोबा-रखुमाईफ्फ्या जयघोष आणि भाविकांचा उस्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले. दरवर्षीप्रमाणे यंदाही संत मुक्ताबाईंची पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली असून, तब्बल १ हजार ५०० किलोमीटरचा पायी वारी प्रवास ७४ दिवसांत पूर्ण होणार आहे. राज्यातील ३५ तालुके, अनेक शहरे व खेड्यांतून ही पालखी मार्गक्रमण करत पंढरपूरला पोहोचणार आहे. देऊळगाव महीत पालखी दाखल होताच विठ्ठल मंदिर संस्थान, एकता ग्रुप ढोल पथक, वारकरी संप्रदाय आणि भाविकांनी मनोभावे स्वागत केले. ठिकठिकाणी रांगोळ्या, फुलांची उधळण, फटाक्यांची आतषबाजी करत वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. हॉटेल प्रसाद परिसरात वारकऱ्यांना चहा-पाणी, तर शहरात विविध ठिकाणी बिस्किटे, फराळ पाकिटांचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यादरम्यान देऊळगाव राजा ठाणेदार ब्रम्हा गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथकासह पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## पहाटे ३ वाजता घराचा दरवाजा ओलांडला अन् दिपाली गायब!

# सुनगावातील २५ वर्षीय विवाहितेचा ठावठिकाणा नाही; जळगाव जामोद पोलिसांचा शोध सुरू



**जनसंचलन-ज. जामोद**

तालुक्यातील सुनगाव येथून काळजी वाढवणारी आणि अंगावर काटा आणणारी घटना समोर आली आहे. घरातील सर्वजण निद्राधीन असताना २५ वर्षीय विवाहिता दिपाली अर्जुन पाटील या पहाटेच्या सुमारास राहत्या घरातून अचानक बाहेर पडल्या आणि त्यानंतर त्यांचा काहीच पत्ता लागलेला नाही. ही घटना १ जुलै २०२६ रोजी पहाटे ३ ते ३.३० वाजताच्या दरम्यान घडल्याची माहिती आहे. दिपाली या कोणालाही काहीही न सांगता घराबाहेर गेल्यानंतर बराच वेळ परतल्या नाहीत. त्यामुळे कुटुंबीयांची धावपळ उडाली. नातेवाईकांनी परिसरात, ओळखीच्या ठिकाणी तसेच संभाव्य ठिकाणी शोध घेतला; मात्र दिपाली यांचा थांगपत्ता लागला नाही. अखेर पती अर्जुन किसन पाटील यांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशन गाठून तक्रार नोंदवली. या प्रकरणी मिसिंग क्र. ६७/२०२६ नुसार नोंद करण्यात आली असून, ठाणेदार सचिन बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल रविकांत बावस्कर पुढील तपास करीत आहेत. दिपाली पाटील या वय २५ वर्षे, रंग निमगोरा, उंची ५ फूट ५ इंच, बांधा मजबूत, केस लांब असून शेवटच्या वेळी साडी व ब्लाउज परिधान केलेले होते. वरील वर्णनाची महिला आढळल्यास त्वरित जळगाव जामोद पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कोरोना काळात जीव धोक्यात आता भत्त्यासाठी उपोषणाची वेळ!



**जनसंचलन-मोताळा**

तालुक्यातील कोऱ्हाळा बाजार येथे कोरोना काळात जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या अंगणवाडी मदतनीस व आशा वर्कर्स यांना अद्याप कोरोना भत्ता मिळालेला नाही. या अन्यायाविरोधात संबंधित महिलांनी १ जुलै २०२६ पासून दररोज दुपारी १२ ते ३ या वेळेत उपोषण सुरू केले आहे. आज उपोषणाचा तिसरा दिवस असताना ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन त्यांच्या मागण्यांची दखल घेतली. कोरोना काळात गावोगावी फिरून आरोग्य सर्वेक्षण, जनजागृती, औषधोपचाराची माहिती, रुग्णांची नोंद आणि प्रशासनाला मदत अशी धोकादायक जबाबदारी या महिलांनी पार पाडली. मात्र संकट काळात पुढे केलेल्या या हातांना आज हक्काच्या भत्त्यासाठी रस्त्यावर बसावे लागत आहे, ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे. हक्काचा कोरोना भत्ता तातडीने मिळाला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# मेहकर तालुक्यात काळजाचा थरकाप!

## आईच्या कुशीत झोपलेला राज राजगडवर साप काळ बनून आला वीज नसल्याने ओळख चुकली अन् चिमुरड्याचा अंत

**जनसंचलन-मेहकर**

कुशीत गाढ झोपलेला पाच वर्षांचा निष्पाप चिमुरडा मध्यरात्री काळ बनून आलेला साप गावात वीज नसल्याने गडद अंधार आणि सर्पदंश ओळखण्यात झालेली चूक! मेहकर तालुक्यातील राजगड येथे घडलेल्या या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे. राज अभिषेक राठोड वय ५ वर्ष असे मृत चिमुरड्याचे नाव आहे. राज नेहमीप्रमाणे रात्री आपल्या आईच्या कुशीत झोपला होता. मध्यरात्री सुमारे २.१५ वाजता एका विषारी सापाने त्याच्या पायाला दंश केला. तीव्र वेदनेने राज रडत उठला आणि आईला जागे केले. मात्र त्या वेळी गावातील वीजपुरवठा खंडित होता. सर्वत्र काळाकुट्ट अंधार असल्याने टॉर्च आणि मोबाईलच्या प्रकाशात शोध घेऊनही नेमके काय झाले, हे समजू शकले नाही. अंधारात मुलाला कदाचित उंदराने चावा घेतला असावा, असा अंदाज कुटुंबीयांनी बांधला. दरम्यान, राजला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र मागे नातेवाईकांनी घरात पुन्हा शोध घेतला असता, राज झोपलेल्या गोधडीखालीच विषारी साप लपलेला आढळून आला. तेव्हा सर्वांच्या पायाखालची जमीनच सरकली. रुग्णालयात डॉक्टरांनी तपासणी करून हा उंदराचा नव्हे, तर सर्पदंश असल्याचे स्पष्ट केले. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. विष शरीरात पसरल्याने डॉक्टरांचे प्रयत्न अपुरे पडले आणि राजला मृत घोषित करण्यात आले.



आईच्या कुशीत सुरक्षित समजल्या जाणाऱ्या लेकराचा असा दुर्दैवी अंत झाल्याने राठोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होणे किती जीवघेणे ठरू शकते, याचे हे भयावह उदाहरण ठरले असून गावकऱ्यांत संतापाची लाट उसळली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८